
# आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास



K/363

संपादक
डॉ. शशिकांत साळवे

# आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास

संपादक
डॉ. शशिकांत साळवे

शब्दश्री प्रकाशन, जुन्नर

Aadivasi Sahitya, Samaj, Sanskruti Ani Vikas
आदिवासी साहित्य, समाज, संस्कृती आणि विकास

संपादकाधीन

प्रकाशक : सौ तारादेवी भास्कर शेळके
१२१, श्रीदुर्गा, बारव, ता. जुन्नर,
जि.पुणे, ४१० ५०२

मुखपृष्ठ : निखिल लंभाते

प्रकाशन क्रमांक : ३८

प्रथमावृत्ती : २८ डिसेंबर २०१८

अक्षरजुळणी : यशोदीप पब्लिकेशन्स्
२१७ ब, नारायण पेठ, पुणे-३०.

मुद्रक : समर्थ प्रोसेस, पुणे

ISBN : 978-93-84309-36-7

मूल्य : रु. ४५०/-

संप

"आदिवासी साहित्य, समा
चर्चासत्रात सादर केलेल्या अभ्यास
विशेष आनंद होत आहे. ह्या च
संस्कृती,विकास यावर चर्चा घडव
रोजी चर्चासत्राचे आयोजन केले.
ह्या चर्चासत्राच्या निमित्ता
संस्कृती, प्रथा, परंपरा, बाली भ
समाजसुधारक व डॉ. बाबासाहे
आदिवासी समाजात झालेला बद
साहित्य समजून घेण्यासाठी या स
पुन्हा स्पष्ट झाले आणि आदिवा
अधोरेखित झाले.
प्रस्तुत ग्रंथ पूर्णत्वास येत
बाळासाहेब कोळप साहेब ह्यांचे मो
सर्वच पदाधिकारी आणि महावि
कर्मचारी ह्यांनीही प्रोत्साहन दिले,
श्री पंढरीनाथ कला, वाणि
सहकारी ह्यांनी ह्या ग्रंथसंपादन का
ऋण व्यक्त करणे मी माझे कर्तव्य स
दर्जेदार शोधनिबंध सादर केले आहे
त्या विचारांशी संपादक आणि प्र
ग्रंथाच्या प्रकाशनची धुरा शब्दश्री
घेतली. त्यांचेही आभार मानल्याशि
अशक्य आहे, सर्वच अभ्यासकां
योग्यवेळी आपल्या हाती देता आ
हा ग्रंथ निश्चितच उपयुक्त ठरेल, त
प्रतिक्रिया कळविल्यास त्याचे नि

* आदिवासी कवितेतीलप्रतीकसृष्टी – प्रा.डॉ.विजय काळे २९६
* आदिवासी कवितेमधून शिक्षणाचा
मूलमंत्र : एक अभ्यास – डॉ. सुभाष सदाशिव पुलावळे ३००
* आदिवासी समाज विकास, विस्थापन
आणि आदिवासी कविता – डॉ. सखाराम डाखोरे ३११
* आदिवासी कादंबरी : एक चिंतन – प्रा. मुक्ता राजेंद्र आंभेरे ३२१
* आदिवासी नियतकालिके :
उद्‌गम आणि विकास – कुंडलिक चिंधू पारधी ३२६
* आदिवासी लोककला :
स्वरूप व परंपरा – प्रा. डॉ. दिलीप कारभारी कसबे ३३२
* आदिवासी वाद्य आणि
आदिवासी नृत्य – डॉ. हनुमंत भवारी ३४०
* आदिवासी साहित्य – समाज – प्रा.डॉ.अतुल नारायण चौरे ३४७
* आदिवासी साहित्य समाज,
संस्कृती आणि विकास – प्रा.डॉ.बागुल एम.एम. ३५३
* आदिवासी साहित्य संस्कृतीचे
जागतिकिकरणात स्थान – प्रा. म्हस्के सीताराम ३६०
* आदिवासी लोककला – डॉ. सुनील काशिनाथ खामगळ ३६९
* आदिवासी लोकसाहित्य
– लोकजीवन – भास्कर शेळके ३७५
* आदिवासी साहित्य : समाज,
संस्कृती आणि विकास – डॉ.सौ.मंगल एकनाथ डोंगरे ३८१
* जागतिकीकरणाच्या परिप्रेक्ष्यातून
आदिवासी कविता – प्रा. अनिल गोवर्धन पवळ ३८७
* मराठी साहित्यात आदिवासी
कथेचे योगदान – प्रा.आहेर एकनाथ पंडित ४०२
* महाराष्ट्रातील आदिवासींच्या
लोककला – प्रा.भामरे युवराज देवबा ४११
* आदिवासी समाजाची स्थितीगती – राहुल गायकवाड ४१७

# आदिवासी वाद्य आणि आदिवासी नृत्य

–डॉ. हनुमंत भवारी

प्रास्तविक –

आदिवासी समाज आज २१ व्या शतकातही तो दुर्लक्षितच आहे. त्यांचा सामाजिक, आर्थिक विकास फारसा झालेला दिसत नाही. सामाजिक आर्थिक विकास झाला नसला तरी मात्र सांस्कृतिक व कलात्मक दृष्टिने आदिवासी मात्र जगाच्या तुलनेत अग्रेसर आहे. त्यांनी त्यांची संस्कृती त्यांच्या विविध कला अंतकरणापासून जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. काही प्रमाणात आदिवासी लोक शिकलेले आहेत. शहरामध्ये मुख्य प्रवाहाबरोबर वावरत आहेत. समाजात होणाऱ्या बदलांचा स्वीकार करत आहोत. परंतु तरीही आपल्या कलाविष्काराशी असलेले नाते मात्र त्यांचे अतुट आहे. आदिवासी समाज जंगल दऱ्याखोऱ्यात राहून सुद्धा, अनेक सोई-सुविधांपासून तो वंचित आहे. परंतु त्यांची सांस्कृतिक बाजू मात्र त्यांनी समृद्ध ठेवण्याचा प्रयत्न केला आहे.

आज जगाच्या तुलनेत म्हणजेच, इतर समाजाच्या तुलनेत तो कितीतरी मागे आहे. परंतु तरीही तो समाधानी आहे. त्यांच्याकडे पैसा नाही. गाडी नाही, बंगला नाही, घालायला कपडे नाही. तरीही तो आपल्या जीवनातील या अपूरेपणाचा कोणाला दोष देत नाही, तो समाधानाने राहतो. आपले जगणे आनंददायी करत निसर्गाच्या सान्निध्यात सुखी समाधानी वावरतो. तो

## ाणि आदिवासी नृत्य

-डॉ. हनुमंत भवारी

२१ व्या शतकातही तो दुर्लक्षितच आहे. ास फारसा झालेला दिसत नाही. सामाजिक तरी मात्र सांस्कृतिक व कलात्मक दृष्टिने त अग्रेसर आहे. त्यांनी त्यांची संस्कृती ापासून जोपासण्याचा प्रयत्न केला आहे. ोक शिकलेले आहेत. शहरामध्ये मुख्य माजात होणाऱ्या बदलांचा स्वीकार करत कलाविष्काराशी असलेले नाते मात्र त्यांचे । जंगल दऱ्याखोऱ्यात राहून सुद्धा, अनेक आहे. परंतु त्यांची सांस्कृतिक बाजू मात्र के आहे.

ृणजेच, इतर समाजाच्या तुलनेत तो कितीतरी ाधानी आहे. त्यांच्याकडे पैसा नाही. गाडी कपडे नाही. तरीही तो आपल्या जीवनातील देत नाही, तो समाधानाने राहतो. आपले व्या सान्निध्यात सुखी समाधानी वावरतो. तो



आपल्या पूर्वजांनी साजरे केलेले, आपल्या संस्कृतीने आपल्याला दिलेले, सर्व सण-उत्सव साजरे करतो. गाणी गातो, नृत्य करतो. कामा-धंद्यातून थकल्यावर थोडा विरंगुळा म्हणून किंवा इतर उत्सवामधून तो आपला विरंगुळा नृत्यातून करत असतो. नृत्यासाठी तो प्रवृत्त होतो. त्याची पावले थिरकू लागतात. त्याचे एक दुसरे महत्त्वाचे कारण आहे. ते म्हणजे आदिवासी वाद्य, आदिवासी वाद्य ही आदिवासी गायन व नृत्य यातील महत्त्वाची गोष्ट आहे. आणि आजही ह्या सगळ्या आदिम परंपरा जो जपत, सांभाळत, आला आहे. म्हणूनच आदिवासी संस्कृती ही जगात आदर्श निर्माण करणारी संस्कृती आहे असे म्हणता येते. या कलांमध्ये नृत्यामध्ये संगीताची साथ देण्यासाठी जी वाद्ये वापरतात. ज्या वाद्यामुळे गायन आणि नृत्य यामध्ये जीवंतपणा येतो ती सर्व वाद्य आदिवासी कोठून विकत आणत नाहीत तर ती सर्वच वाद्य आदिवासींनी स्वतः बनविलेली असतात.

"संगीत, नृत्य व गीत हा आदिवासी स्त्रियांचा अतिशय जिव्हाळ्याचा विषय आहे. या कलांना आदिवासी जीवनात श्वासाइतकेच महत्त्व आहे. त्यांच्या नृत्याला व गीताला संगीताची साथ आवश्यक असतेच. आदिवासी स्त्री कला निर्मितीची खरीखुरी साक्ष आहे. त्यांचे संगीत, गीत व त्यांची नृत्ये- आदिवासी संस्कृतीत यांना सामाजिक आणि धार्मिकदृष्ट्या अतिशय महत्त्व आहे. अनंत अडचणींनी भरलेल्या त्यांच्या एकसुरी कंटाळवाण्या जीवनात गाणी, वाद्ये आणि नाचणे हाच काय तो विरंगुळा असतो. सामाजिक, धार्मिक, समारंभ-सणवार आणि शेती या प्रसंगातून आदिवासींना नृत्य-गाण्याच्या अनेक संधी उपलब्ध होतात. आदिवासींचे नृत्य, संगीत आणि गीते मुख्यतः त्यांच्या वाद्यांवर अवलंबून असतात. आदिवासींची वाद्ये बाजारात मिळत नाहीत. ती ते स्वतःहाच बनवितात. त्यांची वाद्ये रंगीबेरंगी गोट्यांनी, रंगीत मण्यांनी, पक्ष्यांच्या रंगीत पिंसानी तसेच छोटे छोटे आरसे, रिबन यांनी आदिवासींची वाद्ये सजविलेली असतात. आदिवासी वाद्ये आजही त्यांच्या आदिम स्वरुपातच आहेत. याला मुख्य कारण म्हणजे आदिवासी नृत्य आणि वाद्ये यांचा संबंध त्यांच्या धार्मिक कल्पनांशी जोडला आहे."[१]

अशा विविध रंगा-ढगात वावरणारा आदिवासी समाजबांधव आपली

परंपरा, कलासंस्कृती, विज्ञान व तंत्रज्ञानाच्या युगातही टिकवून ठेवण्यात यशस्वी झाला. आदिवासींची ही कला संस्कृती महाराष्ट्र तसेच संपूर्ण विश्वासाठी भूषण ठरलेली आहे. नागर संस्कृतीत परिवर्तनाचे वारे वाहू लागले तरी आदिवासींच्या वनसंस्कृतीचे गहन गूढ अरण्यातच आहे! आदिवासीच्या या आदिकला देश-विदेशातील जनतेलाही नेहमीच प्रेक्षणीय ठरल्या आहेत.

### आदिवासी नृत्य

आदिवासी समाज हा कष्ट करुन आपली रोजी-रोटी मिळविणारा समाज, कष्ट केले तर अन्न मिळणार, नाहीतर उपाशी पोटी फिरावे लागणार! त्यांच्या पाचवीलाच काबडकष्ट पुजलेले असतात, असे म्हणाना! रात्रदिवस शेतात घाम गाळतात, रक्त आटवतात परंतु त्यातून मात्र फार काही मिळत नाही. फक्त दोन वेळेचे जेवण ऐवढेच या दिवस भराच्या मरमर राबण्यातून मिळालेले मोल! इतर समाज्याप्रमाणे त्यांनाही कष्ट करुन थकवा आल्यावर श्रमपरिहार म्हणून किंवा आपल्या संस्कृतीचे संवर्धन म्हणून, तेही नृत्याला जवळ करतात. त्यामध्ये स्वतःला झोकून देतात, देहभान हरपून नृत्य करतात. प्रा. भ. म. परसवाळे म्हणतात, "लोकनृत्य हे आदिवासी जीवनाचे खरे जिवंत अंग आहे. त्यात आनंद, चैतन्य, ताल, लय, सारे काही आहे. निसर्गाचे भव्यदिव्य उदात्त करुणामय असे रुप पाहून त्यांच्या भावना आर्त बनतात. साऱ्या संकटांना हसत, खेळत नाचत सामोरे जाण्याचे धैर्य अन् कसब निसर्गानेच त्यांच्यात निर्माण केले आहे. म्हणूनच त्यांच्या लोककलांमधून निसर्गातील रंग, रुप, गंध याचा अविष्कार झोलला दिसतो. पर्वत, कडे, कपाऱ्या, ओढे, वनराणी, पशूपक्षी, वीज, वादळे पाऊस एकूण सारा निसर्ग त्यांच्या लोककलात बोलका होतो. दारिद्र्य, पिळवणुक, जाच, औदासिन्य, सारी नष्टचर्ये निसर्गाच्या चैतन्यमय अवस्थेत गळून पडतात. आणि आदिवासींचे जीवन क्षणभर का होईना आनंदाने बेहोष होते. झडणाऱ्या संततधार पावसाने ते न्हाऊन निघते. डोंगर दऱ्यातून खळाळणाऱ्या पाण्याबरोबर ते खळाळते. ऋतूबरोबर फुलून येते. तसेच वीज, वादळ, कंप डरकाळ्या या बरोबर ते कांपते, भरभरते, पिसाळते, उसळत आर्त बनते व वेळप्रसंगी त्यांच्या

ानाच्या युगातही टिकवून ठेवण्यात
स्कृती महाराष्ट्र तसेच संपूर्ण विश्वासाठी
परिवर्तनाचे वारे वाहू लागले तरी
अरण्यातच आहे! आदिवासींच्या या
नेहमीच प्रेक्षणीय ठरल्या आहेत.

ून आपली रोजी-रोटी मिळविणारा
नाहीतर उपाशी पोटी फिरावे लागणार!
ले असतात, असे म्हणाना! रात्रदिवस
ा पण त्यातून मात्र फार काही मिळत
या [illegible]स भराच्या मरमर राबण्यातून
त्यांनाही कष्ट करुन थकवा आल्यावर
कृतीचे संवर्धन म्हणून, तेही नृत्याला
ून देतात, देहभान हरपून नृत्य करतात.
ोकनृत्य हे आदिवासी जीवनाचे खरे
तन्य, ताल, लय, सारे काही आहे.
असे रुप पाहून त्यांच्या भावना आर्त
ळत नाचत सामोरे जाण्याचे धैर्य अन्
आहे. म्हणूनच त्यांच्या लोककलांमधून
वेष्कार झोलला दिसतो. पर्वत, कडे,
ीज, वादळे पाऊस एकूण सारा निसर्ग
ारिद्र्य, पिळवणुक, जाच, औदासिन्य,
स्थे[illegible]ठून पडतात. आणि आदिवासींचे
ोष होत. झडणाऱ्या संततधार पावसाने
ळाळणाऱ्या पाण्याबरोबर ते खळाळते.
वादळ, कंप डरकाळ्या या बरोबर ते
ा आर्त बनते व वेळप्रसंगी त्यांच्या



लोकनृत्यातून गाण्यांतून वाद्यातून जिवंत होऊन कालरुप धारण करते, म्हणूनच त्यांच्या कला, जीवनाच्या पातळीवर तितक्याच अभिजात ठरतात.''२

आदिवासी समाज हा अत्यंत दुर्गम भागामध्ये वसलेला आहे. त्यांना तेथे कोणत्याही करमणूकीच्या साधनांचा आस्वाद घेता येत नाही. त्यामुळे करमणूकीचे साधन म्हणून नृत्य हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहे. त्याला आपण त्यांच्या संस्कृतीपासून वेगळे करु शकत नाही. त्याच्यामध्ये त्यांच्या धार्मिक विधी असो किंवा शेतातील पिकांच्या कापणीचा प्रसंग असो अशा प्रसंगी ते जंगलातील खडतर जीवन कष्ट, तहानभूक विसरुन सभोवतालच्या निसर्गाशी एकरुप होऊन मुक्तपणे बेभान होऊन नाचतात.

डॉ. गोविंद गारे म्हणतात, ''आदिवासी नृत्य ही भारतीय लोकनृत्याचा पाया समजली जातात. लोकनृत्य आणि आजची शिष्टनृत्ये यांच्या मुद्रा आणि अंगविक्षेप, हे याच नृत्यातून आरंभी घेण्यात आले. आदिवासींची नृत्ये ही स्वयंस्फूर्त अंगविक्षेप अथवा उत्स्फूर्त भावनांच्या भरात तालबद्ध झालेले अंगविक्षेप आहेत. या अंगविक्षेपातून त्यांच्या उत्कट भावना प्रकट होत असतात. भारतात आदिवासींच्या नृत्यांना एक मोठे राष्ट्रीय महत्त्व आहे.''३

डॉ. राजेंद्र ठाकरे म्हणतात, ''आदिवासींच्या जीवनात लोकगीतांप्रमाणेच नृत्याला त्यांच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. वैयक्तिक नृत्यापेक्षा सामुहिक नृत्याचा अविष्कार जास्त प्रमाणात दिसून येतो. या समूहमनाच्या एकत्रीकरणातून स्त्री आणि पुरुषांच्या समानतेचे दर्शन घडते. होळी, लग्न तसेच विशिष्ट विधिच्या प्रसंगी नृत्य केले जाते. समुह नृत्यातील पदलालित्य सौंदर्यपूर्ण असते. विलक्षण मनोवेधक असते. दिवसभर कष्टाची कामे करुन थकून भागून आलेला आदिवासी जेंव्हा ढोलावरची थाप ऐकतो तेव्हा त्यांचा थकवा कधीच निघून जातो. सामुहिक नृत्याच्या प्रसंगी आदिवासींमध्ये उत्साह संचारलेला असतो. समुहमनाचे हे नृत्यातील विलोभनीय पदलालित्य चित्तवेधक असते. बघणाऱ्यालाही जीवनाचा निरागस आनंद लुटावा असे वाटू लागते. आदिवासींच्या लोकनृत्यातून त्या-त्या जमातीचे सामाजिक

परंपराचे सभासमारंभाचे प्रतिबिंब पडलेले दिसते. नृत्यात व्यक्तिपेक्षा समुहाला प्राधान्य असते. लोकनृत्याच्या हालचालीत सहजपणा जाणवतो. आदिवासी समाज विविध जमातींनी विभागला गेला आहे. प्रत्येकाची बोलीभाषा वेगळी असली तरी नृत्यांबाबत थोड्याफार फरकाने साम्य दिसून येते.''४

आदिवासींमध्ये नृत्याच्या ज्या पद्धती आहेत. त्या सर्वांमध्ये वाघ, सिंह, हत्ती, लांडगा, कोल्हा, अस्वले, पक्षी अशा सारख्या पशूपक्षांच्या हालचालीचा आविष्कार झालेला आढळतो. त्या प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या हावभावाची फक्त नक्कलच केली जाते. पण मुखवटा अंगावर चढवला की त्या प्राण्यांचा संचार त्याच्या अंगात झाल्याचा भास होतो किंवा आपणच तो प्राणी झालो आहोत, अशी तादम्य भावना उत्पन्न होते आणि त्या भावनेतून नृत्य अधिक रंगते.

आदिवासींच्या या लोकनृत्यातून त्यांच्या अनेक प्रवृत्तींचे दर्शन घडते त्यांच्या लढाऊ वृत्तीचे दर्शन ते आपल्या नृत्यातून दाखवितात त्यांचे शौर्यदर्शन सुद्धा त्यांच्या नृत्यातून ते दाखवितात. त्यांच्या धार्मिक भावना, सामाजिक प्रवृत्ती त्याचबरोबर शृंगार या गोष्टीही ते नृत्यातूनच दाखवितांना दिसतात. साहित्याच्या क्षेत्रात आदिवासी लेखिकांचे-लेखकांचे फार योगदान नसले तरी सांस्कृतिक अंगाने आदिवासींचीं कला-नृत्य, गीत, लोकसाहित्य आपल्याला जगाच्या सांस्कृतिक घटनांच्या मुळाशीच असल्याचे दिसते. त्यांना या नृत्यासाठी प्रवृत्त करावे लागत नाही. त्यांना फक्त विशेष वाद्य वाजयला लागले की, त्यांना आपोआपच स्फूरण चढते आणि ते स्वतःहून त्या नाचामध्ये सहभागी होतात आणि अक्षरशः भान हरवून, ते रात्र-दिवस त्या नाचामध्ये धुंद होतात. महाराष्ट्रामध्ये आदिवासी जमातीच्या यादीत एकूण ४७ जमाती आहेत. त्या आदिवासी जमातींची सांस्कृतिक, सामाजिक आणि धर्माचाराची जडणघडण एकसारखी नाही. त्यात पाया एकच असला तरी त्यात प्रांतानुसार थोडाफार फरक पाहायला मिळतो.

**सारांश-**

महाराष्ट्रामध्ये अनेक प्रकारची अशी लोकनृत्य पाहायला मिळतात. तारपा नाच, कांबड नाच, गौरी नाच, घोरनाच, ढोलनाच, बोहाडा, शिकारी



नृत्ये, टिपऱ्या,
खाडी गम्मत,
दिसतात. तारपा
गौरी नाच या ना
नादनदेवाच्या पुजे
जातात. घोरनाच
नाचही म्हणतात.
ढोलाच्या ताला
असते. 'दंडार' हे
नृत्यात पुरुष रंगीबे
करतात. हे नृत्य
नृत्यांचा थाट यापेक्ष
मोठ्या बासऱ्यांचे
पगड्या, त्यात खो
त्यामुळे नृत्य साधी
जमातीमध्ये सण उ
करण्यापेक्षा श्रमाचा
जाते. अहोरात्र आ
विविध प्रवृत्तीचे दर्श
प्रवृत्ती, शृंगार या ग
घोरीनाच, ढोलनाच,
दिंडणनृत्य,
नृत्य प्रकार महाराष्
आदिवासीची जीवना
संगीतांची साथ देणारे
मांदळ, घंगळी, तार
पावा ही विविध वाद
पाडतात. गीत, संगीत

ा दिसते. नृत्यात व्यक्तिपेक्षा समुहाला
ंगीत सहजपणा जाणवतो. आदिवासी
ा आहे. प्रत्येकाची बोलीभाषा वेगळी
क्राने साम्य दिसून येते.''४

पद्धती आहेत. त्या सर्वांमध्ये वाघ,
ो, पक्षी अशा सारख्या पशूपक्षांच्या
ळतो. त्या प्राण्यांच्या व पक्ष्यांच्या
. पण मुखवटा अंगावर चढवला की
ल भास होतो किंवा आपणच तो
ाना उत्पन्न होते आणि त्या भावनेतून

त्यांच्या अनेक प्रवृत्तींचे दर्शन घडते
ा नृत्यातून दाखवितात त्यांचे शौर्यदर्शन
त्यांच्या धार्मिक भावना, सामाजिक
ते नृत्यातूनच दाखवितांना दिसतात.
क्रांचे-लेखकांचे फार योगदान नसले
ी कला-नृत्य, गीत, लोकसाहित्य
ांच्या मुळाशीच असल्याचे दिसते.
ागत नाही. त्यांना फक्त विशेष वाद्य
पच स्फुरण चढते आणि ते स्वतःहून
अक्षरशः भान हरवून, ते रात्र-दिवस
मध्ये आदिवासी जमातीच्या यादीत
सी जमातींची सांस्कृतिक, सामाजिक
खी नाही. त्यात पाया एकच असला
ाहायला मिळतो.

अशी लोकनृत्य पाहायला मिळतात.
ोरनाच, ढोलनाच, बोहाडा, शिकारी



नृत्ये, टिपऱ्या, बारवनृत्य, गोसईनृत्य, दिंडण नृत्य, दंडार, करमा नृत्य, खाडी गम्मत, डाहाका, गोंड गोवारी असे अनेक नृत्यप्रकार महाराष्ट्रात दिसतात. तारपा हा वारली जमातीच्या आवडता नाच आहे. कांबड नाच व गौरी नाच या नाचात पुरुष नाचतात आणि गाणीही म्हणतात. कांबडनृत्य नादनदेवाच्या पुजेच्यावेळी केले जाते. याशिवाय घोरनाच व ढोलनाच केले जातात. घोरनाच म्हणजे टिपऱ्यांचा नाच याला काही ठिकाणी दांडीया नाचही म्हणतात. ढोलनाच हा एक प्रकारचा कसरतीचा खेळच आहे. ढोलाच्या तालावर चाललेली आदिवासी तरुणांची ही एक सर्कसच असते. 'दंडार' हे कोलामांचे नृत्य हे नृत्य दिवाळीच्या वेळी केले जाते. ह्या नृत्यात पुरुष रंगीबेरंगी पोषाख करतात व काही पुरुष स्त्रियांसारखा पोशाख करतात. हे नृत्य लग्न-सोहळ्यापूर्वी केले जाते. मेळघाटातील कोरकूंच्या नृत्यांचा थाट यापेक्षा निराळा असतो, मोठ्या आकाराच्या डफबरोबर लहान मोठ्या बासऱ्यांचे मंजुळ स्वर त्यांच्या नृत्याला साद देत असतात. रंगीबेरंगी पगड्या, त्यात खोवलेली मोहक मोरपिसे, बायकांचे लाल रंगाचे पोशाख त्यामुळे नृत्य साधी असली तरी मोहक असतात. प्रत्येक आदिवासी जमातीमध्ये सण उत्सवात नृत्य करण्याची प्रथा आहे. नृत्य हौस म्हणून करण्यापेक्षा श्रमाचा थकवा घालविण्यासाठी मनोरंजन म्हणून नृत्य केले जाते. अहोरात्र आदिवासी नृत्यात धुंद होताना दिसतात. नृत्यातून त्यांच्या विविध प्रवृत्तीचे दर्शन घडते, लढाऊवृत्ती, शौर्यदर्शन, धार्मिकता, सामाजिक प्रवृत्ती, शृंगार या गोष्टीचे दर्शन घडते. तारपानाच, कांबडनाच, गोरीनाच, घोरीनाच, ढोलनाच, बोहाडा, शिकारी नृत्ये, टिपऱ्या, बारवनृत्य, गोराईनृत्य, दिंडणनृत्य, दंडार, करमा नृत्य, खाडी जमात डाहाका, गोंड गांवारी असे नृत्य प्रकार महाराष्ट्र दिसतात. श्रमपरीहासाठी, मनोरंजनासाठी नृत्य ही आदिवासीची जीवनाभिमुख संकल्पना आदर्शवत आहे. आदिवासींच्या गीताला संगीताची साथ देणारे मुख्य घटक म्हणजे त्यांची ढोल, ढोलक, नगारा, डफ, मांदळ, घंगळी, तारपा, तुणतुणे, ताशा, किंगरी, टिमकी, घुंगरु, टिपऱ्या, पावा ही विविध वाद्य आदिवासींना आपल्या नादावर ताल धरायला भाग पाडतात. गीत, संगीत, नृत्य हा आदिवासींच्या जीवनातील अविभाज्य भाग

आहे. तसेच ह्या गोष्टी एकमेकांना पूरक आहेत. कामातून विळंगुळा म्हणून तो ही वाद्य वाजवितो, त्यांच्या नादात तो स्वभान विसरतो. विशेष म्हणजे ही वाद्य तो कोणत्याही बाजारातून विकत आणत नाही, तर तो स्वतः ते तयार करतो. ही वाद्य प्राण्याची कातडी, दूधी भोपळा, मातीची भांडी, तांब्यांची भांडी, तांब्याच्या तारा, लोखंडी तारा, घोड्याचे केस, वेळू वनस्पती, लाकडाचा ओंडका, लाकडी काठ्या, पितळी किंवा कासेची थाळी, हरणाचे शिंग अशा घटकांपासून बनविले जातात. आदिवासींच्या जीवनात वाद्यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे.

संदर्भ-


१. हिवाळे अलका, आदिवासी लोकगीतातील स्त्री जीवन, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००२. पृ.१८८

२. गारे गोविंद, आदिवासी लोकनृत्य, लय, ताल आणि सूर, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २००४. पृ.१-२

३. तत्रैव, पृ.0१

४. देवरे रमेश, लोकसाहित्य दर्शन, डॉ.कर्मवीर प्रकाशन, पुणे, प्रआ. २००९. पृ.२२५